डॉक्टर डी सोटोची


आफ्रिका यात्रा



विलियम

डॉक्टर डी सोटोची
आफ्रिका यात्रा

मराठी : अश्विनी बर्वे



डॉक्टर बर्नार्ड डी सोटो एक दंत वैद्यक म्हणून लाखात एक होते. सगळ्या जगाला त्यांच्या बद्दल आणि त्यांची पत्नी डेबोरा बद्दल माहिती होती, ती त्यांना कामात मदत करत असे.



तार आली त्या संध्याकाळी ते गाणी ऐकत होते डॉक्टर डी सोटो तुम्ही लवकर पश्चिम आफ्रिकेत या. इथे एका हत्तीच्या दातात प्रचंड वेदना होत आहेत. इथे कोणी डेंटिस्ट त्याला मदत करू शकत नाही.याबदल्यात मी तुम्हांला मालामाल करून टाकेल.


- आपला मुदाम्बो हत्ती

डॉक्टर डी सोटो कधी विदेशात गेले नव्हते की कधी त्यांनी हत्तीच्या तोंडात हात घातला होता.श्रीमती डी सोटो गात म्हणाल्या: “आपण जरूर जाऊ” आणि त्यांचे पती म्हणाले : पत्नीला मिठीत घेत ते म्हणाले, “हो जरूर.“






त्यानंतर दोन दिवसांनतर पती आणि पत्नी डेक वरच्या आरामदायी खुर्चीवर बसून समुद्रात उड्या मारणारे मासे बघत होते आणि व्हेल माशांचे निरीक्षण करत होते.एका दुःखी हत्तीला मदत करण्यासाठी ते महान महासागराचा आनंद घेत होते.



जेव्हा जहाज डबवानला पोहचले, तेव्हा रुग्णाचा भाऊ आदिबा त्यांची वाट पहात होता. त्याने डी सोटा दांपत्याला त्वरित ओळखले. कारण जहाजातून उतरणारे ते एकमेव उंदीर होते. आदिबाने स्वतःचा परिचय करून दिला, मग त्यांना त्यांच्या सामानासहित मुदाम्बोच्या घरी घेवून आला.



मुदाम्बो आपल्या डॉक्टरांना पाहून एवढा उल्हसित झाला की त्याच्या तोंडून काही शब्दच निघत नव्हते. ”तुमच्या दोघांचे आभार,“ तो भावूक होऊन म्हणाला.




जगातल्या या भागात त्यावेळी संध्याकाळचे सात वाजले होते. त्यामुळे मिसेस मुदाम्बो सगळ्यांना रात्रीच्या जेवणासाठी घेवून गेल्या. मुदाम्बो घास चावून खाऊ शकत नव्हते.म्हणून त्यांनी नारळाच्या गरम दुधा बरोबर एक मोठी अस्पिरीनची गोळी घेतली.

"मी आज मिठाई खाणार नाही," श्रीमती मुदोम्बो म्हणाल्या.कारण माझ्या पतीच्या दातात वेदना आहेत."

प्रत्येकजण खाण्यासाठी बागेत गेले. नंतर डॉक्टर डी सोटो आणि त्यांच्या पत्नीने मुदोम्बोच्या दातांची तपासणी केली, याचसाठी तर ते आफ्रिकेत आले होते.

"डॉक्टर डी सोटोनी इतके किडलेले दात कधी पहिले नव्हते. इतर कोणी दंत वैद्यक दात बरा करू शकला नाही याचे त्यांना आश्चर्य वाटले नाही."
डॉक्टर डी सोटांनी घोषणा केली की, “मी हा किडलेला दात परत ठीक करू शकतो असा मला विश्वास आहे.”
“त्यासाठी मला तुमच्या त्या दाताचा छोटा तुकडा पाहिजे ज्यावर माझी पत्नी आत्ता बसली आहे.”


श्रीमती मुदाम्बो यांनी एक समजदारीचा उपाय सुचवला. “प्राकृतिक इतिहास संग्रहालयात सगळ्या वालरस चे दात आहेत, आपण त्यांचा उपयोग नाही का करू शकणार?” “तिथे भव्य असा दात आहे आणि त्याचा रंग बिलकुल हत्तीच्या दाताच्या रंगासारखाच आहे."



मुदाम्बो आठवले की त्याचे हत्तीचे मोठे दात ही त्याची शान होती.
ती त्याची विशेष ओळख होती.
“मी याच्यावर विचार करेन,” तो म्हणाला.

प्रत्येकाला खात्री होती की संग्रहालय मुदम्बोच्या दातासाठी एक तुकडा द्यायला मना करणार नाही. वालरसला सुद्धा हे मान्य होईल.

एडीबा संग्रहालयात गेला, जे शुक्रवारी रात्री उशिरापर्यंत उघडे असते.
डॉक्टर डी सोटा आपल्या कामात तेव्हा मग्न होते.परंतु डॉक्टरच्या साध्या हलक्या स्पर्शाने सुद्धा मुदाम्बो दुःखाने कण्हत होता.
डॉक्टरांना ऑपरेशनच्यावेळी कोणत्या हत्यारांची गरज लागते, याची चागली माहिती श्रीमती डी सोटोना होती.



डॉक्टरांना ऑपरेशनच्यावेळी कोणत्या हत्यारांची गरज लागते, याची चागली माहिती श्रीमती डी.सोटोना होती.

झोपण्याची वेळ सुद्धा टळून गेली होती पण डॉक्टरांचे काम अजूनही बाकी होते. अर्ध्या रात्री दातांचे कुशल डॉक्टर आणि त्यांच्या सक्षम सहाय्यकाने आणि दुःखी रोगी यांनी झोपण्याचा निर्णय घेतला आणि दुसऱ्या दिवशी सकाळी परत ऑपरेशन सुरु करण्याचे ठरले.



डॉक्टर डी सोटा आणि त्यांची पत्नी मुदाम्बोच्या गुलाबी गादीवर जावून झोपले.

जवळजवळ अर्ध्या रात्री जेव्हा त्यांची पत्नी झोपली होती तेव्हा डॉक्टर बर्नार्ड डी सोटो यांचे अपहरण झाले. एका हाताने त्यांचे तोंड झाकले आणि नंतर होनकटकोक नावाच्या श्रीमंत माकडाने त्यांना उचलून नेले.





“सर, हे काय आहे? त्यांचे तोंड मोकळे केल्याबरोबर डॉ. डी सोटो यांनी विचारले. “तुम्ही मला कुठे नेत आहात?”

“बकवास बंद कर!” माकड जोरात ओरडले. होनकिटकोक आणि मुद्म्बो यांचे जुने वैर होते. मुदाम्बो ने एकदा सार्वजनिक ठिकाणी माकडांना “मूर्ख“ म्हटले होते. ते माकड भारत सोडून यासाठी इथे आला नव्हता की कोणी हत्तीने त्याला बेइज्जत करावं. त्याला मुद्म्बोला खूप दुःख द्यायचे होते. देण्याचा त्याचा विचार होता.



होनकटकोंकने दंत वैद्यांना जंगलातल्या आपल्या गुप्त जागेत घेवून गेला, तिथे डॉक्टरांना एका पक्ष्याच्या पिंजऱ्यात बंद करून ठेवले आणि पानांनी तो झाकून टाकला. "तुम्हांला असे करण्याचा कोणताही कायदेशीर अधिकार नाही." डॉक्टर डी सोटा व्याकुळतेने म्हटले. होनकटकोक ने काही उत्तर दिले नाही. नंतर तो तिथून दूर निघून गेला, तो स्वतःवर खूप खुश होता.

"किती मूर्ख आहे मी," दंत वैद्यक स्वतःशी बडबडले. त्यांनी पिंजऱ्याचे गज वाकवून वेगळे करण्याचा प्रयत्न केला. पण यश आले नाही. रात्रभर ते पिंजऱ्यात गोल गोल फिरत राहिले. आणि आपल्या प्रिय पत्नीची काळजी करत राहिले. आता आपल्या पत्नीची हालत खूप खराब असेल.





आणि त्यांचा अंदाज अगदी खरा होता, डेबोरा सुद्धा गोल गोल फेऱ्या मारत होती. तिच्या प्रिय बर्नार्डला एखाद्या जंगली जनावराने तर खाल्ले नाही ना? तो लांडगा असेल की एखादी भित्रट मांजर? की त्याच्या कपड्यासहित एखाद्या अजगराने तर नाही ना त्याला गिळले?



यात काहीच शंका नाही की डॉक्टर डी सोटांना त्यांच्या रुग्णाची सुद्धा काळजी वाटत होती.त्याच्या दाताचे दुःखणे कसे होते? बिचारा मुदाम्बो गळ्यातील खवखविमुळे अधिक त्रास सहन करू शकत नव्हता. कधी तो वेदनेने फरशीवर लोळत होता तर कधी घरात गोंधळ घालत होता.




कोणी मला शोधत असेल का?“ डॉक्टरांना आश्चर्य वाटले.डबवानचे सगळे लोक त्यांना इकडे तिकडे सगळीकडे शोधत होते. क्दुसऱ्या दिवशी डॉक्टरांनी दोन वेळा आवाज ऐकला: ”डॉक्टर डी सो-ओ–टो डॉक्टर बर्नार्ड डी-सी–टो” ते परत ओरडले, मी इथेआहे, इथे, इकडे आहे,“ त्यांचा आवाज खूप सावकाश येत होता. हे विसरू नका ते एक उंदीर होते.




पाच दिवसांपासून डॉक्टरांना काही खायला प्यायला मिळाले नव्हते. त्यामुळे डॉक्टर डी सोटांना आपण मरू की काय असे वाटायला लागले.आपल्या प्रिय डेबोरोला परत पाहू शकू की नाही याविचारामुळे रागाने ते वेडे झाले होते.मग त्यांनी पिंजऱ्याच्या गजांना जोरात वाकवले आणि त्यातून ते बाहेर पडले. ती एक चांदणी रात्र होती.

"मी येतोय, डेबोरा, मी येतोय!" ते म्हणाले. अशक्त झाल्यामुळे ते अंधारात कसेबसे चालत होते. शेवटी थकून ते एका दगडावर पडले आणि त्यांच्या पायाला फ्राक्चर झाले.




"आता पुढे काय होणार?" डॉक्टरांनी स्वतःलाच विचारले. ते आता एक इंच सुद्धा हलू शकत नव्हते. त्यांची सारी ताकद संपली होती.


डॉक्टर डी सोटो पाठीवर पडून-पडून आपल्या पत्नीच्या नावाचा जप करत होते. जर ते आफ्रिकेत आले नसते तर!



परंतु सुदैवाने सूर्योदयाच्या पूर्वीच शोधणाऱ्या लोकांनी त्यांना शोधून काढले. मग सगळे लोक धावत त्यांच्याकडे आले.

डॉक्टर डी सोटो ची अवस्था बघून शोधणारे लोक घाबरले. त्यांनी त्यांच्या पायाच्या घोट्याकडे पाहिले आणि मग डॉक्टरांना स्ट्रेचरवर झोपवून मुद्बोच्या घरी घेवून गेले. तिथे पती–पत्नी खूप वेळ एकमेकांना मिठी मारून रडत राहिले.





एक पनीर सांडविच आणि दोन कप कडक चहा प्यायल्यानंतर डॉक्टरांनी सगळी परिस्थिती आपल्या हातात घेतली. एका खेळण्यातल्या व्हीलचेअरवर ते बसले आणि तिथून त्यांनी त्यांच्या पत्नीला पुढे काय करायचे याच्या सूचना दिल्या आणि त्या नुसार तिने ऑपरेशन केले.

श्रीमती डी सोटोनी उरलेले किडलेले दात कोरले आणि कुशलतेने संग्रहालयातल्या वालरसच्या दाताचा तुकडा तिथे बसवला.दात सोंडेत नीट बसल्यानंतर मुदाम्बोची दाढ जणूकाही नवीनच झाली.



आता खूप काळानंतर हत्तीच्या चेहऱ्यावर हसू आले. तो खळखळून हसत होता. त्यादिवशी मुदाम्बोने आपल्या पत्नी बरोबर नाच केला. नंतर त्याने कच्च्या भाज्यांचे जेवण केले. त्यानंतर त्याने शेंगदाणे खाल्ले.

त्यानंतर डी सोटो दाम्पत्याचे काय झाले? मुदाम्बो ने त्यांच्या वचनानुसार डी सोटोला एक मोठा पुरस्कार दिला.



"बर्नार्ड," श्रीमती डी सोटोने म्हटले, “मला वाटते की, तुला बरे वाटेपर्यंत आपण इथे आराम करू. नंतर आपण आपल्याला हे जे महागाचे बक्षीस मिळाले आहे, त्याचा उपयोग आपल्या या सुंदर ग्रहावरील काही भाग बघण्यासाठी करू या.”

“माझी प्रिय डेबोरा,” डॉक्टर डी सोटोने म्हटले, ”तू अगदी माझ्या मनातली बोललीस.”

समाप्त